# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक 14/06/2018 रोजी (का.प.क्र.02) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक 14 जुन 2018 रोजी (का.प.क्र.02) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजू) वैद्य यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-30 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01 श्री.गजानन रामकिसन बारवाल
02 श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत
03 श्री.सिध्दांत संजय शिरसाट
04 श्रीमती राखी प्रशांत देसरडा
05 श्री.सय्यद मतीन रशीद
06 श्रीमती शेख नरगीस सलीम
07 श्री.वाघमारे रूपचंद लक्ष्मण
08 श्रीमती स्वाती किशोर नागरे
09 श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
10 श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
11 श्रीमती खान सायरा बानो अजमल
12 श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
13 श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
14 श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
15 श्री.अब्दुल नविद अब्दुल रशिद

(यावेळी मा.सभापती श्री राजु वैद्य यांची सभापती पदावर निवड झाल्याबद्दल सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले.)

श्री.गजानन बारवाल : राष्ट्रसंत भय्युजी महाराज यांचे दु:खद निधन झाले आहे, त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

मा.सभापती :ठिक आहे श्रध्दांजली साठी सर्वांनी उभे रहावे.

(यावेळी राष्ट्रसंत भय्युजी महाराज यांना सभागृहातर्फे दोन मिनिट सावध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.)

**विषय क्र. 02 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत क्रांती चौक येथे मुख्य योजनेच्या 700 व 1400 मीमी व्यासाच्या जलवाहिन्यातून पाणी पुरवठा होवून क्रांती चौक परिसरात विविध क्षमता व उंचीचे जलकुंभ, संप पंपगृह यामध्ये साठविण्यात येते. दोन्ही योजनेद्वारे शहराकरीता येणारे पाणी परिमाण वर नमुद क्रांती चौक परिसरात येवून त्यानंतर पूढील भागांना वितरीत होते. क्रांती चौकाच्या मागे वितरण सुरू असतांना जलवाहीनीवर पाण्याचा दाब नसल्याने क्रांती चौकातील टाक्या भरण्यासाठी वेळ लागून पूढील भागांच्या वितरणासाठी अडचणी निर्माण होतात. त्याचप्रमाणे क्रांती चौकातून खोकडपुरा व गांधीनगर भागांना बायपास सप्लाय हा मोठ्या कालावधीचा असल्यामुळे (16 ते 18 तास) यामुळे देखील जलकुंभ भरणे व पुढील शहागंज, जिन्सी या मुख्य भागांना पाणी पुरवठा करण्यास अडथळा निर्माण होतो.

क्रांतीचौक जलकुंभ परिसरात 15 व 24 लक्ष लि. क्षमतेच्या जलकुंभामध्ये साधारणत: 33x12 मी जागेपैकी 25x8 मी जागा उपलब्ध आहे. या जागेमध्ये पहिल्या टप्प्यात 5 लक्ष लि. क्षमतेची साठवण टाकी व पंपगृह तयार केल्यास व आवश्यक क्षमतेच्या पंपींग मशिनरीची उभारणी करून अस्तित्वातील जलकुंभ कमी वेळेत भरता येतील. याद्वारे बायपास पाणी पुरवठा होणाऱ्या भागांना जलकुंभावरून जास्त दाबाने व कमी वेळात पाणी पुरवठा करणे शक्य आहे. यामुळे क्रांतीचौका पूढील भागांना देखील पाणी पुरवठा बऱ्याचअंशी सुरळीतपणे करता येईल.

प्रकरणात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सन 2016-17 नुसार क्रांतीचौक येथे 5 लक्ष लि. क्षमतेचा प्रि-फॅब्रीकेटेड संप, आर.सी.सी. व बांधकामातील पंपगृह तसेच संप करीता आवश्यक जलवाहीनी व विविध व्हॉल्व व अनुषंगीक कामांचा अंतर्भाव असलेला प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. करीता प्रस्ताव अंदाजपत्रक रक्कम रूपये 46,71,849/- मा.स्थायी समिति सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :विषय क्र.2 या प्रस्तावाची माहिती द्यावी.

कार्य.अभियंता :प्रस्ताव क्र.2 आणि 3 मध्ये या टाक्या भरण्यामध्ये प्रेसर क्रिएट होत नाही. टाक्या कमी भरल्या जातात. त्यामुळे पाण्याचा सप्लाय व्यवस्थित होत नाही. त्यामुळे ही कामे करणे आवश्यक आहे.

श्री.गजानन बारवाल :यापूर्वी काय प्रयत्न केला आहे.

कार्य.अभियंता :यापूर्वी टाकीचा जो-जो प्रॉब्लम आहे, त्या-त्या वेळी आवश्यक कामे केली होती. येणारे अडचणी दुर करण्याचा प्रयत्न केला.

मा.सभापती : विषय क्र.2 मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक जलकुंभ परिसरात 15 व 24 लक्ष लि. क्षमतेच्या जलकुंभामध्ये साधारणत: 33x12 मी जागेपैकी 25x8 मी उपलब्ध जागेमध्ये पहिल्या टप्प्यात 5 लक्ष लि. क्षमतेचा प्रि-फॅब्रीकेटेड संप, आर.सी.सी. व बांधकामातील पंपगृह तसेच संप करीता आवश्यक जलवाहीनी व विविध व्हॉल्व व अनुषंगीक कामांसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 46,71,849/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 03 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने अंतर्गत गारखेडा (S.F.S.) येथे अस्तित्वातील 32 लक्ष लि. क्षमतेचा व 15 मीटर उंचीचा जलकुंभ असून त्याद्वारे दिनांक 11/05/2018 रोजीच्या नियोजनाप्रमाणे 4 थ्या दिवशी रात्री जलकुंभ भरल्यानंतर त्यानंतर येणाऱ्या पहिल्या दिवशी विष्णुनगर, जवाहर कॉलनी, शास्त्रीनगर, बौध्दनगर, उत्तमनगर इत्यादी मोठ्या परिसरांना पाणी पुरवठा होतो. दुसऱ्या दिवशी छत्रपतीनगर, अलंकार हौ.सोसायटी, परिमल हौ. सोसायटी, आदर्श कॉलनी व पुंडलीकनगर च्या काही भागांना पाणी पुरवठा होतो. तिसऱ्या दिवशी विद्यानगर, मेमन कॉलनी, राणानगर, विजयनगर, विशालनगर, संदेशनगर, आदी भागांना पुरवठा होतो. मुख्य योजनेच्या क्रांतीचौक येथील 180 अश्वशक्तीच्या पंपाद्वारे जलकुंभ भरण्यात येऊन मार्गस्थ सुराणानगर, बालाजीनगर, उत्तमनगर या ठिकाणचा पाणी पुरवठा बायपासद्वारे होत असल्यामुळे, मागे वितरण सुरू असतांना जलवाहीनीवर पाण्याचा दाब नसल्याने सदर जलकुंभ भरण्यासाठी वेळ लागून पुढील भागांच्या वितरणासाठी अडचणी निर्माण होतात.

गारखेडा (S.F.S.) जलकुंभ परिसरात 32 लक्ष लि. क्षमतेच्या जलकुंभाजवळ साधारणत: 35x8 मी. जागा उपलब्ध आहे. या जागेमध्ये पहिल्या टप्प्यात 5 लक्ष लि. क्षमतेची साठवण टाकी व पंपगृह तयार केल्यास व आवश्यक क्षमतेच्या पंपींग मशिनरीचे उभारणी करून अस्तित्वातील जलकुंभ कमी वेळेत भरता येतील. याद्वारे बायपास पाणी पुरवठा होणाऱ्या भागांना जलकुंभावरून जास्त दाबाने व कमी वेळात पाणी

पुरवठा करणे शक्य आहे. त्यामुळे जलकुंभ भरण्याचे प्रमाण वाढून पाणी पुरवठा बऱ्याचअंशी सुरळीतपणे करता येईल.

प्रकरणात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण दरसूची सन 2016-17 नुसार गारखेडा (S.F.S.) येथे 5 लक्ष लि. क्षमतेचा संप, आर.सी.सी. व बांधकामातील पंपगृह तसेच संप करीता आवश्यक जलवाहीनी व विविध व्हॉल्व व अनुषंगीक कामांचा अंतर्भाव असलेला प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. करीता प्रस्ताव अंदाजपत्रक रक्कम रूपये 43,23,141/- मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : विषय क्र.3 मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा (S.F.S.) जलकुंभ परिसरात 32 लक्ष लि. क्षमतेच्या जलकुंभाजवळ साधारणत: 35x8 मी. उपलब्ध जागेमध्ये पहिल्या टप्प्यात 5 लक्ष लि. क्षमतेचा संप, आर.सी.सी. व बांधकामातील पंपगृह तसेच संप करीता आवश्यक जलवाहीनी व विविध व्हॉल्व व अनुषंगीक कामांसाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 43,23,141/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 04 :**

कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, हगणदारी मुक्ती हे विषय नागरीकांच्या व्यवहार/सवय यांच्याशी निगडीत आहे. हे विषय कायमस्वरूपी हाताळण्यासाठी एकीकडे महानगरपालिकेचा सेवेचा दर्जा वाढवावा लागतो (अर्थात Professional पध्दतीने प्रत्येक घरातून कचरा गोळा करणे, त्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रीया करणे इत्यादी), तर दुसरीकडे नागरीकांशी चर्चा करून त्यांना या कामामध्ये सहभागी करून त्यांच्या सामुहिक स्तरावर मानसिक परिवर्तन (Positivity) ची कार्यवाही आवश्यक असते. व्यवहार परिवर्तन किंवा मानसिकतेत बदल, हे एक विशेष Specialised काम असून या कामामध्ये (Participative) लोकसहभागाच्या प्रक्रियेतून नागरीकांना त्यांच्या परिस्थितीचा स्वतः आकलन करून द्यावा लागतो (Self analysis) आणि त्यांना 'trigger' करून स्वतःच्या जबाबदाऱ्या सामुहिक स्तरावर पार पाडण्यास सहाय्य केला जातो.

ही Approach जनजागृतीपेक्षा वेगळी आहे. जनजागृतीमध्ये नागरीकांमध्ये जागरूकता आणली जाते. मात्र जागरूकता हा व्यवहार परिवर्तनाची सुरूवात आहे. फक्त जनजागृतीमुळे व्यवहार परिवर्तन होत नाही. त्यासाठी सातत्याने नागरीकांसोबत चर्चा/संवाद करावा लागतो. त्या उपाययोजनामध्ये लोक सहभागी होतात, पुढाकार घेतात आणि शासनाची भूमिका facilitator (सहाय्याची) ची असते.

या Approach ला 'Community Approach' असे म्हटले जाते. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम असतात. उदा. CLTS (Community Led Total Sanitation- समुह संचलित संपूर्ण स्वच्छता) पध्दतीने 'triggering' (अशी कोणतीही कार्यवाही जी नागरीकांना त्यांच्या परिस्थितीचे विश्लेषण करायला आणि त्याची उपाययोजना करायला भाग पाडते), लोक चळवळीचे नावीन्यपूर्ण उपक्रम, सेवा पुरविण्याच्या पध्दतीचे लोकहिताच्या दृष्टीने सुसूत्रीकरण इ. ही पध्दत विशेषत: ग्रामिण स्वच्छतामध्ये यशस्वीरित्या अवलंबिली गेली आहे. शहर भागामध्ये काही शहरामध्ये (उदा.नांदेड, भुवनेश्वर) पण सदरील पध्दत यशस्वीरित्या राबविली गेली आहे. सदरील पध्दतीद्वारे व्यवहार परिवर्तनामध्ये महत्वपूर्ण फलनिष्पती प्राप्त होते.

औरंगाबाद शहरामध्ये सध्या कचऱ्याची समस्या बिकट असल्यामुळे, याबद्दल मोठ्या स्वरूपात लोकसहभाग मिळविण्याचे आणि व्यवहार परिवर्तन (Segregation, कचऱ्याच्या विकेंद्रीत पध्दतीने व्यवस्थापन इ.) साठी पाऊल उचलणे आवश्यक आहे. या संदर्भात 'Community Approach' मध्ये

नामवंत संस्था Feedback Foundation या संस्थेने औरंगाबाद शहरात हे काम कसे पूढे नेता येईल, त्या बाबतचा प्रस्ताव दाखल केलेला असून त्याचा गोषवारा या सोबत संलग्न आहे.

सदरील संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रस्तावित करण्यात येते की, या संस्थेला सुरूवातीला 3 महिन्यासाठी त्यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रत्येकी 2/3 झोनमध्ये कामे करण्यास मंजूरी देण्यात यावी. त्यांनी या कालावधीत त्यांना देण्यात आलेल्या झोनमध्ये त्यांच्या प्रस्तावात नमूद केलेल्या उपक्रम हाती घ्यावेत. सदरील कामासाठी या संस्थेला त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख देण्यात यावे. 3 महिन्यानंतर संस्थेचे काम बघुन त्यांचे काम पूढे ठेवण्याबद्दल योग्य तो निर्णय घेता येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्र.4,5 आणि 6 हे तिन्ही विषय कच-या संदर्भात आहे. मा.आयुक्त पदाधिका-यासोबत मिटिंग होती कि, आपले शहर स्वच्छ व्हावे आणि कच-याचा जो प्रॉब्लम आहे त्यासाठी प्रत्येक नागरिकांनी तज्ञ व्यक्तीचे या शहराला मार्गदर्शन करावे.कचरा प्रश्न सुटावा यासाठी सर्वांनी एकत्रीत येऊन काम करावे, जनतेमध्ये जनजागृती व्हावी त्यासाठी हे प्रस्ताव आलेले आहे. संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

घन कचरा (व्यवस्थापक):घन कचरा व्यवस्थापना संदर्भात महाराष्ट्र शासनाने PMC नेमली आहे. त्यांनी DPR तयार केला आहे. त्या DPR अंतर्गत IC Activity, जनजागृती करिता काही निधी राखीव ठेवलेला आहे, आणि हि जनजागृती करण्याकरिता केंद्रशासनाच्या मा.आयुक्तांना काही सुचना आल्या आहेत.स्वच्छ भारत विषया करिता केंद्रसरकारमध्ये 3 एजन्सीने काम केले आहे. या एजन्सीत झोन वाटप करण्यात येतील.त्यांचा मासिक खर्च 10 लाख असुन त्यांना नियुक्ती देण्यात यावी यासाठी प्रस्ताव केला आहे.

श्री.गजानन बारवाल :सामाजिक स्तरावर मानसिक परिवर्तन स्पेशालाईज काम त्याप्रमाणे Respective काम आणि लोक सहभागातुन काम या तीन्ही विषयाबद्दल आम्ही शहरात काम करत आलो आहोत.कचरा देणे साफसफाई करुन देणे या बद्दल आम्ही नियमीत बोलत आहोत आता पुन्हा स्पेशालाईज काम असु शकते का?

मा.सभापती : स्कोप ऑफ वर्क म्हणजे नेमका काय काम करायचे आहे.

श्री गजानन बारवाल :मानसिक परिवर्तन म्हणजे नेमका काय करायचे?

कक्ष प्रमुख (घनकचरा) :कच-याचे जे काही वर्गीकरण करायचे आहे ओला आणि सुका परंतु प्रत्येक घरामध्ये तो वर्गीकरण करुन भेटत नाही.उदा.वृक्षारोपण करणे ही चांगली गोष्ट आहे, परंतु प्रत्येक व्यक्ती वृक्षारोपण करत नाही आणि हे नॉलेज आम नागरिका पर्यंत न्यायचे आहे,तरत्याला continue मन परिवर्तन नागरिकांचे करावे लागेल.

मा.सभापती : मा.आयुक्त यांनी ठराव दिले मंजुर करणे आवश्यक आहे.

श्री.गजानन बारवाल : संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत यावे. तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढे योग्य तो निर्णय घ्यावा, यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत येते, तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढील योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा, या दुरूस्तीसह प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, हगणदारी मुक्ती हे विषय नागरीकांच्या व्यवहार/सवय यांच्याशी निगडीत असल्याने व औरंगाबाद शहरामध्ये सध्या कचऱ्याची समस्या बिकट असल्यामुळे, याबद्दल मोठ्या स्वरूपात लोकसहभाग मिळविण्याचे आणि व्यवहार परिवर्तन (Segregation, कचऱ्याच्या विकेंद्रीत पध्दतीने व्यवस्थापन इ.) साठी पाऊल उचलणे आवश्यक आहे. या संदर्भात 'Community Approach' मध्ये नामवंत संस्था Feedback Foundation या संस्थेने औरंगाबाद शहरात हे काम कसे पूढे नेता येईल, त्या बाबतचा प्रस्ताव दाखल केलेला असून त्यास मान्यता देण्यांत येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत येते, तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढील योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा, या दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 05 :**

कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, हगणदारी मुक्ती हे विषय नागरीकांच्या व्यवहार/सवय यांच्याशी निगडीत आहे. हे विषय कायमस्वरूपी हाताळण्यासाठी एकीकडे महानगरपालिकेचा सेवेचा दर्जा वाढवावा लागतो (अर्थात Professional पध्दतीने प्रत्येक घरातून कचरा गोळा करणे, त्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रीया करणे इत्यादी), तर दुसरीकडे नागरीकांशी चर्चा करून त्यांना या कामामध्ये सहभागी करून त्यांच्या सामुहिक स्वरावर मानसिक परिवर्तन (Positivity) ची कार्यवाही आवश्यक असते. व्यवहार परिवर्तन किंवा मानसिकतेत बदल, हे एक विशेष Specialised काम असून या कामामध्ये (Participative) लोकसहभागाच्या प्रक्रियेतून नागरीकांना त्यांच्या परिस्थितीचा स्वतः आकलन करून द्यावा लागतो (Self analysis) आणि त्यांना 'trigger' करून स्वतःच्या जबाबदाऱ्या सामुहिक स्तरावर पार पाडण्यास सहाय्य केला जातो.

ही Approach जनजागृतीपेक्षा वेगळी आहे. जनजागृतीमध्ये नागरीकांमध्ये जागरूकता आणली जाते. मात्र जागरूकता हा व्यवहार परिवर्तनाची सुरूवात आहे. फक्त जनजागृतीमुळे व्यवहार परिवर्तन होत नाही. त्यासाठी सातत्याने नागरीकांसोबत चर्चा/संवाद करावा लागतो. त्या उपाययोजनामध्ये लोक सहभागी होतात, पुढाकार घेतात आणि शासनाची भूमिका facilitator (सहाय्याची) ची असते.

या Approach ला 'Community Approach' असे म्हटले जाते. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम असतात. उदा. CLTS (Community Led Total Sanitation- समुह संचलित संपूर्ण स्वच्छता) पध्दतीने 'triggering' (अशी कोणतीही कार्यवाही जी नागरीकांना त्यांच्या परिस्थितीचे विश्लेषण करायला आणि त्याची उपाययोजना करायला भाग पाडते), लोक चळवळीचे नावीन्यपूर्ण उपक्रम, सेवा पुरविण्याच्या पध्दतीचे लोकहिताच्या दृष्टीने सुसूत्रीकरण इ. ही पध्दत विशेषतः ग्रामिण स्वच्छतामध्ये यशस्वीरित्या अवलंबिली गेली आहे. शहर भागामध्ये काही शहरामध्ये (उदा.नांदेड, भुवनेश्वर) पण सदरील पध्दत यशस्वीरित्या राबविली गेली आहे. सदरील पध्दतीद्वारे व्यवहार परिवर्तनामध्ये महत्वपूर्ण फलनिष्पती प्राप्त होते.

औरंगाबाद शहरामध्ये सध्या कचऱ्याची समस्या बिकट असल्यामुळे, याबद्दल मोठ्या स्वरूपात लोकसहभाग मिळविण्याचे आणि व्यवहार परिवर्तन (Segregation, कचऱ्याच्या विकेंद्रीत पध्दतीने व्यवस्थापन इ.) साठी पाऊल उचलणे आवश्यक आहे. या संदर्भात 'Community Approach' मध्ये नामवंत संस्था Action for better Aid Society या संस्थेने औरंगाबाद शहरात हे काम कसे पूढे नेता येईल, त्या बाबतचा प्रस्ताव दाखल केलेला असून त्याचा गोषवारा या सोबत संलग्न आहे.

सदरील संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रस्तावित करण्यात येते की, या संस्थेला सुरूवातीला 3 महिन्यासाठी त्यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रत्येकी 2/3 झोनमध्ये कामे करण्यास मंजूरी

देण्यात यावी. त्यांनी या कालावधीत त्यांना देण्यात आलेल्या झोनमध्ये त्यांच्या प्रस्तावात नमूद केलेल्या उपक्रम हाती घ्यावेत. सदरील कामासाठी या संस्थेला त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख देण्यात यावे. 3 महिन्यानंतर संस्थेचे काम बघुन त्यांचे काम पूढे ठेवण्याबद्दल योग्य तो निर्णय घेता येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत यावे. तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढे योग्य तो निर्णय घ्यावा, यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत येते, तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढील योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा, या दुरूस्तीसह प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, हगणदारी मुक्ती हे विषय नागरीकांच्या व्यवहार/सवय यांच्याशी निगडीत असल्याने व औरंगाबाद शहरामध्ये सध्या कचऱ्याची समस्या बिकट असल्यामुळे, याबद्दल मोठ्या स्वरूपात लोकसहभाग मिळविण्याचे आणि व्यवहार परिवर्तन (Segregation, कचऱ्याच्या विकेंद्रीत पध्दतीने व्यवस्थापन इ.) साठी पाऊल उचलणे आवश्यक आहे. या संदर्भात 'Community Approach' मध्ये नामवंत संस्था Action for better Aid Society या संस्थेने औरंगाबाद शहरात हे काम कसे पूढे नेता येईल, त्या बाबतचा प्रस्ताव दाखल केलेला असून त्यास मान्यता देण्यांत येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत येते, तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढील योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा, या दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 06 :**

कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, हगणदारी मुक्ती हे विषय नागरीकांच्या व्यवहार/सवय यांच्याशी निगडीत आहे. हे विषय कायमस्वरूपी हाताळण्यासाठी एकीकडे महानगरपालिकेचा सेवेचा दर्जा वाढवावा लागतो (अर्थात Professional पध्दतीने प्रत्येक घरातून कचरा गोळा करणे, त्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रीया करणे इत्यादी), तर दुसरीकडे नागरीकांशी चर्चा करून त्यांना या कामामध्ये सहभागी करून त्यांच्या सामुहिक स्वरावर मानसिक परिवर्तन (Positivity) ची कार्यवाही आवश्यक असते. व्यवहार परिवर्तन किंवा मानसिकतेत बदल, हे एक विशेष Specialised काम असून या कामामध्ये (Participative) लोकसहभागाच्या प्रक्रियेतून नागरीकांना त्यांच्या परिस्थितीचा स्वतः आकलन करून द्यावा लागतो (Self analysis) आणि त्यांना 'trigger' करून स्वतःच्या जबाबदाऱ्या सामुहिक स्तरावर पार पाडण्यास सहाय्य केला जातो.

ही Approach जनजागृतीपेक्षा वेगळी आहे. जनजागृतीमध्ये नागरीकांमध्ये जागरूकता आणली जाते. मात्र जागरूकता हा व्यवहार परिवर्तनाची सुरूवात आहे. फक्त जनजागृतीमुळे व्यवहार परिवर्तन होत नाही. त्यासाठी सातत्याने नागरीकांसोबत चर्चा/संवाद करावा लागतो. त्या उपाययोजनामध्ये लोक सहभागी होतात, पुढाकार घेतात आणि शासनाची भूमिका facilitator (सहाय्याची) ची असते.

या Approach ला 'Community Approach' असे म्हटले जाते. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम असतात. उदा. CLTS (Community Led Total Sanitation- समुह संचलित संपूर्ण स्वच्छता) पध्दतीने 'triggering' (अशी कोणतीही कार्यवाही जी नागरीकांना त्यांच्या परिस्थितीचे विश्लेषण करायला आणि त्याची उपाययोजना करायला भाग पाडते), लोक चळवळीचे नावीन्यपूर्ण उपक्रम, सेवा पुरविण्याच्या पध्दतीचे लोकहिताच्या दृष्टीने सुसूत्रीकरण इ. ही पध्दत विशेषतः ग्रामिण स्वच्छतामध्ये यशस्वीरित्या अवलंबिली गेली आहे. शहर भागामध्ये काही शहरामध्ये (उदा.नांदेड, भुवनेश्वर) पण सदरील पध्दत यशस्वीरित्या राबविली गेली आहे. सदरील पध्दतीद्वारे व्यवहार परिवर्तनामध्ये महत्वपूर्ण फलनिष्पती प्राप्त होते.

औरंगाबाद शहरामध्ये सध्या कचऱ्याची समस्या बिकट असल्यामुळे, याबद्दल मोठ्या स्वरूपात लोकसहभाग मिळविण्याचे आणि व्यवहार परिवर्तन (Segregation, कचऱ्याच्या विकेंद्रीत पध्दतीने व्यवस्थापन इ.) साठी पाऊल उचलणे आवश्यक आहे. या संदर्भात 'Community Approach' मध्ये नामवंत संस्था Knowledge Links या संस्थेने औरंगाबाद शहरात हे काम कसे पूढे नेता येईल, त्या बाबतचा प्रस्ताव दाखल केलेला असून त्याचा गोषवारा या सोबत संलग्न आहे.

सदरील संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने असे प्रस्तावित करण्यात येते की, या संस्थेला सुरूवातीला 3 महिन्यासाठी त्यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रत्येकी 2/3 झोनमध्ये कामे करण्यास मंजूरी देण्यात यावी. त्यांनी या कालावधीत त्यांना देण्यात आलेल्या झोनमध्ये त्यांच्या प्रस्तावात नमूद केलेल्या उपक्रम हाती घ्यावेत. सदरील कामासाठी या संस्थेला त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख देण्यात यावे. 3 महिन्यानंतर संस्थेचे काम बघुन त्यांचे काम पूढे ठेवण्याबद्दल योग्य तो निर्णय घेता येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत यावे. तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढे योग्य तो निर्णय घ्यावा, यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यांत यावी.

मा.सभापती : सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत येते, तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढील योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा, या दुरूस्तीसह प्रस्तावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, हगणदारी मुक्ती हे विषय नागरीकांच्या व्यवहार/सवय यांच्याशी निगडीत असल्याने व औरंगाबाद शहरामध्ये सध्या कचऱ्याची समस्या बिकट असल्यामुळे, याबद्दल मोठ्या स्वरूपात लोकसहभाग मिळविण्याचे आणि व्यवहार परिवर्तन (Segregation, कचऱ्याच्या विकेंद्रीत पध्दतीने व्यवस्थापन इ.) साठी पाऊल उचलणे आवश्यक आहे. या संदर्भात 'Community Approach' मध्ये नामवंत संस्था Knowledge Links या संस्थेने औरंगाबाद शहरात हे काम कसे पूढे नेता येईल, त्या बाबतचा प्रस्ताव दाखल केलेला असून त्यास मान्यता देण्यांत येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार संबंधीत संस्थेला हे काम 03 महिन्या ऐवजी 05 महिन्यासाठी देण्यांत येते, तसेच या संस्थेला प्रती महिना अंदाजे रूपये 15.00 लाख ऐवजी रू.10.00 लाख प्रती महिना देण्यांत यावे. व 5 महिन्यानंतर सदर संस्थेचे काम बघुन पूढील योग्य तो निर्णय प्रशासनाने घ्यावा, या दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

चर्चा :

श्रीमती सत्यभामा शिंदे :कचरा प्रश्न कायम स्वरुपी सोडवावा. कचरा बद्दल जनतेचा विश्वास वाढवावा, जनजागृती करावी.कचरा वेळेवर उचलावा.

मा.सभापती : स.नगरसेवकांनी ज्या काही सुचना दिल्या आहे, ते लक्षात घेऊन काम करण्यात यावे.

श्रीमती सायरा बानो : शहागंज भागात मोठा कचरा पडुन आहे दुर्गंधी सुटली तर येथील कचरा ताबडतोब उचलावा कचरावर पावडर मारावे. तेथील शेड उंच केले इतर वार्डाचा कचरा माझे वार्डात आणुन टाकला जातो. ते बंद करावे. फ्रुटची घाण टाकतात,बाजुलाच फळांच्या गाड्या आहे फळ विक्रेते फळ विकतात तेच फळे नागरिक खातात. त्यामुळे नागरीकाच्या आरोग्यास धोका होऊ शकतो.

अतिरिक्त आयुक्त :शहागंज येथील कचरा उचलला होता.सिल्लेखाणा येथील कचरा 75 मजुर लावून उचलला त्या प्रमाणे शहागंज येथील कचरा उचलला जाईल.

श्री सय्यद मतीन :पावडर मारण्यापेक्षा तिथुन तो कचरा दुस-या ठिकाणी टाकण्यात यावा असे नियोजन केले पाहिजे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : आमच्या वार्डामध्ये व रमानगर भागात जो कचरा निर्माण होतो आहे, तर त्याच्यावर फवारणी केली पाहीजे.पावडर टाकले जात नाही.

मा.सभापती :जे काही आवश्यक काम आहे ते ताबडतोब करण्यात यावे.

श्रीमती शेख नरगीस :नाला साफ होत नाही बाजुला कचरा टाकला जातो पुन्हा तोच कचरा नाल्यात जातो.

मा.सभापती :याची दखल घ्यावी. कचरा नाल्यात जाणार नाही दखल घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :ज्या-ज्या ठिकाणी नाले साफ करणारे आहे,त्या-त्या ठिकाणी त्यांचे काम बंद केले. ती काढलेली घाण टाकायची कुठे म्हणुन कोणतेही कॉन्ट्रॅक्टर काम करायला तयार नाही. आणि माझ्या वार्डामध्ये पण काम थांबलेले आहे. कांचनवाडी नाला असेल तेथीलही काम थांबले आहे.

मा.सभापती :नाल्यातील घाण उचलली पाहिजे याची दखल घ्यावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :सिडको हडको इथे पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही, MIDC कडुन 5 MLD पाणी घेणार होतो काय केले?

कार्य अभियंता(श्री कोल्हे) :5MLD पाणी घेण्याबाबत MIDC च्या अधिकारी यांच्याशी चर्चा केली.

मा.सभापती :तातडीने निर्ण घ्यावा. पाणी मिळेल याची दखल घ्यावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर :दुषित पाण्याचा प्रश्न सुटला नाही.

मा.सभापती :ज्या-ज्या ठिकाणी दुषित पाण्याच्या संदर्भात नगरसेवकांच्या तक्रारी आहे, त्यासाठी तुम्हाला आवश्यक उपययोजना करणे गरजेचे आहे,आणि दुषित पाणी कुठेही येता कामा नये. तक्रार आल्यावर 24 तासाच्या आत त्याची कारवाई होईल असे नियोजन करावे.

श्री.गजानन बारवाल :काही ठिकाणी 3 दिवसानंतरही लोकांना पाणी मिळत नाही. 3.वाजेचे पाणी 9 वाजेपर्यंत सुध्दा त्यांना पाणी मिळत नाही. सगळ्या शहरात पाणी पुरवठा सुरळीत आणि शुध्द पाणी पुरवठा व्हायला पाहीजे दुषित पाणी येणार नाही याची दखल घ्यावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :सिडको-हडकोला 5व्या 6व्या दिवशी पाणी येते तर ते 3 दिवसा आड करणार आहे कि, नाही याचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती जयश्री कुलकर्णी :क्रांती चौक येथुन जिथे-जिथे पाणी पुरवठा होतो त्याचे शेड्युलच नाही. चौथ्या व पाचव्या दिवशी पाणी येते.

श्रीमती सायरा बानो :शहागंजची जी टाकी आहे, त्याच्यात 17 वार्ड आहे,5,6व्या दिवशी पाणी येते 24 लक्ष लिटरची टाकी आहे पाणी 17 वार्डासाठी अपुरे पडते.नियोजन का होत नाही. किमान 3 दिवसा आड पाणी यावे. हा कोणता नियोजन आहे हा नियोजन बदलला पाहिजे. आणि कमीत कमी 4 दिवसा आड तरी पाणी पुरवठा केला पाहिजे. आणि क्रांतीचौकला जो पाणी सोडत आहे, तर ते नेमलेल आहे.

श्री.अब्दुल मोहंमद.नाविद :राहुलनगर 105 मध्ये अशी परिस्थिती आहे,कि, 4,ते 5 वाजेपर्यंत पाण्याचे प्रेशर एकदम कमी होते, आणि सगळ्या शहराची हीच परिस्थिती आहे.वार्डमध्ये पाणी पहिले दोन दिवसा आड होते, आणि आता 4 दिवसा आड 5, दिवसा आड पाणी येते, आणि कुठे कुठे तर 6 दिवसा आड पाणी येते, तर सगळ्यांना पाणी मिळाले पाहिजे. आम्हाला असे सांगण्यात आल होत कि, 2 दिवसा आड पाणी होणार आहे, तर ते झाले का? रमजान ईद सण आहे.मुबलक पाणी मिळेल दखल घ्यावी.

मा.सभापती : पाणी पुरवठ्याच्या बाबतीत आयुक्त साहेबांशी चर्चा केली होती. तर त्यांनी सांगितले कि, आठवड्या भरात आपण शहराला 2 दिवसा आड पाणी पुरवठा करु. येत्या आठ दिवसात पाणी पुरवठा 2 दिवसा आड होईल. याचे नियोजन करणार आहे.पाणी पुरवठा वाटप करण्यासाठी वेळेत चेंजेस करायचे असले तर त्या-त्या वार्डचे स.सदस्य यांना कल्पना दिली पाहिजे. आता जे वार्डामध्ये कालच सप्लाय होता,तो परवाचा सप्लाय होता,जर त्यांना पाणी द्यायच असेल तर ठरलेल्या दिवशीच पाणी देणार कि पूढे आणखी एक दिवस लांबणार आहे. त्याच्यासाठी काय नियोजन आहे?

कार्य अभियंता (पापू) : त्यांचा जो काही शेड्युल आहे,त्याप्रमाणे पाणी आले नाही तर, टँकरने पाणी देऊ शकतो.

मा.सभापती : ज्या भागात पाणी ठरलेल्या दिवशी मिळाले नाही तर टँकरची व्यवस्था करा. मा.आयुक्त साहेबांशी चर्चा करुन येत्या 8 दिवसामध्ये 2 दिवसा आड पाणी पुरवठा होईल असे नियोजन करा.

श्री.गजानन बारवाल :पदमपुरा या भागामध्ये महानगरपालिका इमारतीसाठी जागा राखीव आहे, तेथे प्रशासकीय झोनसाठी इमारत करावी.

मा.सभापती :त्या ठिकाणी इमारत बांधण्याच्या दृष्टीकोणातुन ज्या काही अडचणी आहे जे कोर्टमॅटर आहे, त्याच्यामध्ये योग्य काही मार्ग निघु शकतो का? त्यासाठी कार्यवाही करावी.

सह संचालक (न र) :त्या बाबत विधी सल्लागाराकडुन माहिती घेण्यात यावी.

मा.सभापती :या बाबत विधी अधिकारी यांनी पुढील बैठकीत सर्व माहिती सादर करावी.

श्री.गजानन बारवाल :राकाज् या संस्थेला BOT वर जागा दिली होती, तेथे विकास करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी.

मा.सभापती :योग्य ती कार्यवाही करावी. पुढील बैठकीस सर्व माहिती सादर करावी.

श्री.गजानन बारवाल :प्रत्येक वार्डसाठी 10 लक्ष बजेट देणार असे ऐकले.स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या बजेट नुसार कामे होणार की,नाही.

मा.सभापती :बारवाल यांनी जो मुद्दा मांडला आहे, तो सगळ्याच नगरसेवकांच्या संबधीत आहे. याच्यामध्ये 10 लाख आणि 5 लाखच खर्च करता येईल अशी मर्यादा करणे योग्य होणार नाही. आणि काही कामांना मंजुरी दिलेल्या आहे, ते तातडीने कामे मार्गी लावावे. असे आदेशित करण्यात येते.

अतिरिक्त आयुक्त :या बाबत धोरणात्मक चर्चा होत आहे.मागील काही कामे प्रलंबीत आहे नवीन ही कामे प्राधान्याने घेऊ असे प्रशासनाचे मत आहे.

श्री.गजानन बारवाल :स्थायी समिती सर्वसाधारण सभेने मंजुर केलेले बजेट नुसार कामे करावी.

मा.सभापती :बजेट मंजुर नुसार सर्व कामे करावीत.

श्रीमती सत्यभामा शिंदे :एजन्सी फिक्सींग संचिका मंजुर होत नाही.

मा.सभापती :अशा संचिका तातडीने मंजुर कराव्यात.

श्री.गजानन बारवाल :ठेकेदारांचे पैसे ताबडतोब द्यावे.

मा.सभापती :प्राधान्यक्रम ठरवावा. रमजान ईद सणाच्या निमित्ताने त्या ठेकेदाराला पेमेन्ट करावे.

श्री.गजानन बारवाल :R.C.H कर्मचारी यांना सेवेत कायम करण्यात यावे निर्णय झाला होता.जागा रिक्त आहे समावेश करावा.

आरोग्य वैद्य अधिकारी : ही कारवाही आस्थापणा विभागाकडुन व्हायला पाहिजे. तसे त्यांना कळविण्यात आले आहे.

उपआयुक्त (प्र) :या रिक्त पदावर सामावून घेण्याचा जो मुद्दा आहे, या संदर्भात मी संपुर्ण तपासणी करुन मा.अतिरिक्त आयुक्त आणि आयुक्त यांच्याकडे 3 दिवसात सादर करणार आहे.

मा.सभापती :या सोबतच स्वच्छता निरीक्षक याचा ही विषय प्रलंबीत आहे.

श्री.गजानन बारवाल :मटन मार्केट बांधकाम करणेस मान्यता झाली त्या बाबत कार्यवाही होत नाही. लोक आता उघड्यावर मटन मच्छी विक्री करतांना दिसतात.

श्रीमती राखी देसरडा :पाणी हे माणसाची सर्वात मुलभुत गरज आहे, आणि आज संपुर्ण शहर हे पाण्यामुळे विस्कळीत झालेले आहे. अगोदरच्या दिड महिन्यापूर्वी 60 टक्के जे टप्पे होते ते 2 दिवसा आड चालत होते, आणि जे 40 टक्के टप्पे होते ते 3 दिवसा आड चालत होते.आणि मागील 1 ते दिड महिन्यापूर्वी संपूर्ण शहरात पाणी हे 3 दिवसा आड करण्यात आले आहे. जे 3 दिवसाआड टप्पे केले आहे, ते पुर्वी 2 दिवसा आड होते. तर एक दिवसाचा जे साठलेले पाणी आहे, त्याचे काय करतात. आज जे 3 दिवसा आड पाणी झालेल आहे, तेही तिथे व्यवस्थित येत नाही. 2 दिवसा आड पाणी जेव्हा दिले जात होते तेव्हा ते वेळेवर येत असे.

मा.सभापती :8दिवसाच्या आत 2 दिवसा आड पाणी पुरवठा करण्यात यावा असे प्रशासनाला आदेशित करण्यात येते.

श्री.वाघमारे रुपचंद :हर्सुल जेल परिसरात बांधकाम परमिशन का मिळत नाही यासाठी नगर रचना विभागाच्या संबंधीत अधिका-यांकडून खुलासा घ्यावा.

सहा.संचालक(न.र) :बांधकाम परवानगी जेल पासून 500 मीटरच्या आत देत नाही. या संदर्भात मा. आयुक्त येत्या 27 जुनला याचे समवेत कमेटीच्या सदस्याची मिटिंग लावण्यात आली आहे.

श्री. वाघमारे रुपचंद :समितीचे अध्यक्ष मा. आयुक्त आहे योग्य निर्णय लवकरात लवकर घ्यावा.

मा.सभापती :27 तारखेच्या बैठकीत या संदर्भात योग्य निर्णय घ्यावा.

श्री.वाघमारे रुपचंद :मी 2 महिने पहिले विषय मांडला होता मोकाट जनावरांचा की जो मालक आहे त्याच्या जवळ 100 ते150 गायी आहे, तर त्यांनी माझ्या वार्डामध्ये शेड बांधलेली आहे. एकतानगर मध्ये आणि मी श्री.नाईकवाडे यांना त्याची माहिती दिली, पण त्यांनी एकही जनावर कोंडवाड्यामध्ये नेऊन टाकले नाही. या नंतरही त्यांचेवर कार्यवाही झाली नाही. त्या जनावरापासून नागरिकांना त्रास आहे. ते मोकाट जनावरे रस्त्याने पळत सूटतात अपघात होतात. कार्यवाही करावी.

मा.सभापती :संबंधीत अधिकारी आज येथे नाही.सभागृहाच्या सूचना त्याचे पर्यंत पोहचण्यात पुढील बैठकीपर्यंत कार्यवाही करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : क्रांतीचौकला महानगरपालिकेची जी जागा आहे,तर त्या जागेवर एका मंगल कार्यालय मालकाने अनाधिकृत वापर करीत आहे. सुचना माडली होती आता त्यांनी स्टे आणला आता तेथे कमर्शियल वापर होतो आहे.

मा.सभापती :ताबडतोब आजच्या आज कार्यवाही करावी.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: गजानन येथील जागेला मनपाच्या नावाचे P.R कार्डवर नाव लावावे मागणी केली कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :मनपाच्या बाजुने निकाल लागल्यानंतर सुध्दा त्या मालमत्तेची नोंद महापालिकेच्या नावाची अद्याप झालेली नाही. तर एवढ्या वर्षापासुन हा प्रकरण चालले आहे, न्यायालयाकडुन निर्णय आला आहे.प्रशासनाने कार्यवाही करावी मनपाच्या नावाचे P.R कार्डवर नाव लावून घ्यावे.

सहा.संचालक (न.र) :माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती :या बाबतीत पुढच्या मिटिंग पर्यंत कार्यवाही करण्यात यावी तशी माहिती सादर करावी.

श्रीमती स्वाती नागरे :माझ्या वार्डामध्ये भाजीमंडी आहे, तिथले अतिक्रमण काढुन घ्यावे.

मा.सभापती :जे अतिक्रमण आहे ते काढुन घेणे आणि गजानन महाराज मंदिर जवळ ज्या हातगाड्या आहे ते 3 दिवसात काढण्यात यावे अशी सुचना आदेशित करण्यात येते.

श्री.सय्यद मतीन :आयुक्त साहेब यांनी विटेकर साहेब यांना सुचना केली होती कि वार्डात जी विहीर होती तर ती साफ करण्यात यावी, आणि साफसफाईच्या कामाची व्यवस्था करण्यात यावी तर त्या कामाचे काय झाले ती विहीर साफ झाली की नाही, याचा खुलासा करावा. वार्डात पाणी देण्याच्या दिवशी पाणी येत नाही.

उपअभियंता वार्ड अधिकारी: सदर विहीरीची पाहणी 8 तारखेला केली होती ती जुनी विहीर आहे. कुराण पेपर आहे पाणी वापरता येणार नाही. ठेकेदार काम करण्यास तयार नाही.

मा.सभापती :जे काम करण्यास तयार असेल त्यांच्याकडुन काम करुन घ्यावे.

श्री.अब्दुल मोहंमद नाविद :सर्व भागात इदगा जवळ साफसफाई करावी.

मा.सभापती :ज्या ठिकाणी मज्जीद आहे ज्या ठिकाणी प्रार्थना होत असेल अशा सर्व ठिकाणी साफसफाई करण्याची यंत्रणा कार्यान्वित करणे गरजेचे आहे अशा सर्व ठिकाणी साफसफाई करावी.

श्री.ऋषीकेश खैरे :वार्डामध्ये किती लाईट लावले आहे ? पाण्याचाही प्रश्न आहे. 30-35 लाईटची यादी दिली जाते. 4-5 लाईट लावतात निघुन जातात.

उपअभियंता(देशमुख) :लाईट लावणे बाबत सुचना दिलेली आहे, आणि श्री खैरे साहेबांच्या वार्डामध्ये लाईटचे काम चालु आहे.

मा.सभापती :जे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे, त्यांना मुदत वाढवुन दिले आहे, गाडी घेऊन जातो तर या 2,3 महिन्यामध्ये लाईट किती लावले?

उपअभियंता (देशमुख) :दररोज लाईटाचे काम करतो आहे.मेन्टेनन्स कामाची काळजी घेत आहे. ठेकेदाराला सुचना दिल्या. नवीन टेंडर लवकरच ओपन होतील.

मा.सभापती :जुने कॉन्ट्रॅक्टर जे आहे त्यांचा कॉन्ट्रॅक 30 तारखेपर्यंत आहे, तर आज पासुन 30 तारखेपर्यंत त्यांच्याकडुन पुर्ण वार्डाचे लाईटाचे 100 टक्के पुर्ण काम होत नाही तोपर्यंत एकाचेही बील द्यायचे नाही आणि शहर अभियंता यांनी पण याच्यात लक्ष घालावे. नवीन टेंडर नुसार 30 जूनच्या नंतर कामे हाती घेतली जातील. जूने एजन्सीकडून राहिलेली सर्व कामे करुन घ्यावी.

श्री.गजानन बारवाल :झोन ड मध्ये कर्मचारी कामासाठी कमी पडतात.

मा.सभापती :आवश्यक कर्मचारी देण्यात यावे.

श्रीमती शिल्पाराणी वाडकर: 05 महिला स्वच्छता गृहाचे काम करणार होते.

कार्य.अभियंता (ड्रेनेज) :मकबरा भागातील शौचालय काम पुर्ण झाले,औरंगपुरा येथील काम चालु आहे. पैठण गेट येथील शौचालयाचा जागेचा वाद चालू आहे. बॉटनिकल गार्डन जवळील शौचालयाचे संबंधीतास पेमेन्ट दिले नाही म्हणून काम अर्धवट आहे.

मा.सभापती :लवकरात लवकर मान्य करुन घ्यावी.

श्रीमती सत्यभामा शिंदे :माझ्या वार्डामध्ये क्रिकेट स्टेडीयमच्या बाजुला जी जागा आहे तेथे स्वच्छता गृहाची मागणी केली होती प्रस्ताव पण मंजुर झालेला आहे.

कार्य.अभियंता(ड्रेनेज) :तेथील काम C.S.R च्या फंडातुन करण्याचा प्रयत्न होता रिस्पॉन्स मिळाला नाही.

मा.सभापती :या बाबतीत ताबडतोब action घेण्यात यावी . शौचालय करण्यात यावे.

श्री.ऋषीकेश खैरे :जो शहरामध्ये कचरा आहे, तर त्याचा डोंगर झाले आहे आणि त्यामुळे लोकांना खुप त्रास होतो आहे. इतर ठिकाणचा जमा केलेला कचरा माझ्या वार्डात भोईवाडा भागात मोकळया जागेवर आणून टाकतात हे योग्य नाही.तेथे बाजुलाच गोण्या बांधुन ठेवल्या त्या घेऊन जात नाही. श्री.मांडुरके यांनी यात लक्ष्य द्यावे.

मा.सभापती :प्रशासना तर्फे या बाबतीत कारवाई करावी.

श्री.सय्यद मतीन :मोकाट कुत्रे रात्रीच्या वेळी जास्त रस्त्यावर फिरतात त्यांना रात्रीच्या वेळीच पकडावे.

मा.सभापती :प्रशासनाने याची दखल घ्यावी. मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त करावा.

याबरोबरच सभा राष्ट्रगीताने संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद